आर.सी.सी. ४०/२०१७
सरकार वि. सुभाष थोरात
**निशाणी** ८५

# आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसारचे निवेदन

माझे नाव – सुभाष निवृत्ती थोरात,
वय – ४८ वर्षे        धंदा - शेती.
रा. इंदोरी, ता. अकोले, जि. अहमदनगर.

| | |
|---|---|
| | अभियोगपक्षाचा पुरावा तुम्हांला समजला, तो मी तुम्हांला वाचुन दाखवत आहे. |
| प्रश्न १ | तुम्हाला विचारल्या जाणा–या प्रश्नांची उत्तरे देणे तुम्हांस बंधनकारक नाही याची तुम्हाला माहिती आहे काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न २ | प्रस्तुत संपरिक्षेच्या पुराव्यात आपल्या विरुध्द दिसणा–या परिस्थित विशेषांच्या व्यक्तिशः खुलासा करण्यासाठी आता तुम्हाला प्रश्न विचारले जातील. सदर प्रश्नांची उत्तरे दिल्यामुळे किंवा त्यांना खोटी उत्तरे दिल्यास तुम्ही स्वतः शिक्षेस पात्र होणार नाही. परंतु तुम्ही दिलेली उत्तरे प्रस्तुत संपरिक्षेत विचारात घेता येईल किंवा अन्य कोणत्याही चौकशीत किंवा संपरीक्षेत तुमच्या बाजुने किंवा विरुध्द मानता येईल, हे तुम्हास समजले काय ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न ३ | अभियोगपक्षाचा सा.क्र. १ सुमन विजय देशमुख यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०१.२०१७ रोजी सकाळी ११:३० वाजता ती, तिचे पती व मुलगा सागर त्यांच्या शेतामध्ये काम करत होते त्यावेळी तुम्ही, आरोपी क्र. २ व त्याची पत्नी शेतामध्ये असलेल्या रस्त्यावर पोल लावण्याचे काम करत होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ४ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यावेळी त्यांनी तुम्हाला विचारणा केली असता की तुम्ही त्या ठिकाणी पोल का रवता, सदरची जागा आमची आहे, त्यावर तुम्ही त्यांना असे |

**निशाणी**

| | |
|---|---|
| | बोलले की, तुमचे शेतच काय मी तुला देखील विकत घेवू शकतो असे बोलून तुम्ही तिच्या कमरेवर हात टाकला होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ५ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यावेळी त्यांनी तुम्हाला ढकलून दिले होते, व तुम्ही खाली पडल्यामुळे तुमच्या डोक्याला किंवा कानाला मार लागला होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ६ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, आरोपी क्र. २ याने तिच्या गालावर चापट मारली होती व आईघाले जास्त शहाणी झाली काय अशी शिवी दिली होती, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ७ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर तिचे पती व मुलगा घटनास्थळी आले होते त्यामुळे तुम्ही त्यांना अशी धमकी दिली की, तुम्हाला तिघांनाही जिवे ठार मारीन, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ८ | अभियोगपक्षाचा सा.नं. २ विजय वसंत देशमुख यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक २६.०१.२०१७ रोजी दुपारी ०१:३० वाजता घडली होती, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ९ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांच्या शेतामध्ये पोल रोवत होते, त्यावेळी ते, त्यांची पत्नी व मुलगा असे शेतामध्ये होते, ते तिघे तुमच्याकडे आले असता त्यांची पत्नी तुम्हाला म्हणाली की, इथे अतिक्रमण करू नका त्यावेळी |

**निशाणी**

| | |
|---|---|
| | तुम्ही तिच्या कमरेला धरले व लोटून दिले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १० | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यामुळे तुमचा पाय सटकला व तुम्ही पडलात, त्यावेळी तुम्ही म्हणालात की, जमिनीसह तुला सुध्दा विकत घेईल, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ११ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर आरोपी क्र. २ तेथे आला व त्याने त्यांच्या पत्नीच्या कानामागे मारले, व तिघांनाही शिवीगाळ केली, धमक्या दिल्या, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १२ | अभियोगपक्षाचा सा.नं. ३ सागर विजय देशमुख यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०१.२०१७ रोजी दुपारी ०१:३० वाजताच्या सुमारास तुम्ही व आरोपी क्र. २ हे त्यांच्या शेताच्या रस्त्यामध्ये पोल रोवण्याचे काम करत होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १३ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यावेळी त्यांची आई तुम्हाला आडवण्यास व पोल का रोवता असे विचारण्यास गेली असता तुम्ही त्यांच्या आईस शिवीगाळ करून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वक्तव्य केले, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १४ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांच्या आईस म्हणाले की, तु कशाला मधे येते, जमिनीसोबत तुला देखील विकत घेतो, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |

| | |
|---|---|
| | खोटे आहे. |
| प्रश्न १५ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांच्या आईला ढकलून दिले त्यामुळे तुम्ही पाय सटकून खाली पडले होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १६ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानंतर ते मध्ये पडल्यानंतर तुम्ही त्यांना देखील शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १७ | अभियोगपक्षाचा सा.नं. ४ प्रल्हाद अनिल हसे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०१.२०१७ रोजी दुपारी ०१:३० वाजताच्या सुमारास ते व जगन देशमुख अंबड शिवरातून जात असताना तुम्ही व आरोपी क्र. २ शेतीच्या रस्त्यावर पोल ठोकत होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १८ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, विजय देशमुख, सुमन देशमुख, सागर देशमुख हे विचारण्याकरीता गेले असता त्यांना तुम्ही शिवीगाळ केली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न १९ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सुमन देशमुख यांना शिवीगाळ करून त्यांच्या कपड्यामध्ये तुम्ही हात घालण्याचा प्रयत्न केला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २० | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुमचा भाऊ सोमनाथ थोरात याने तिच्या गालामध्ये चापट मारून जमीन काय तुला पण विकत घेतो असे म्हणाला व शिवीगाळ केली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |

**निशाणी**

| | |
|---|---|
| प्रश्न २१ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सुमन देशमुख यांनी आरोपी क्र. २ ला ढकलले त्यामुळे ते पाय घसरून पडले व ते पडल्यामुळे त्यांना दगड लागला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २२ | अभियोगपक्षाचा सा.नं. ६ डॉ. सुनिल मारूती साळुंके यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते २६.०१.२०१७ रोजी ग्रामीण रूग्णालय येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २३ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २६.०१.२०१७ रोजी रूग्ण सुमन विजय देशमुख ही दुपारी ०१:३० वाजणेच्या सुमारास पोलीस यादीसह रूग्णालयात आली होती, तिला मारहाणी बाबतचा आरोप होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २४ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तिची तपासणी केली असता, तिच्या कमरेच्या उजव्या भागात १ x ०.५ x ०.३ सेंटिमीटरची जखम आढळून आली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २५ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तसेच डाव्या कमरेच्या भागात १ x ०.५ x ०.३ सेंटिमीटरची जखम आढळून आली व डाव्या गालावर सौम्य सुज आढळून आली, दोन्ही जखमांचे वय ६ तासाच्या आत होते व जखमेचे स्वरूप साधे होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २६ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यानुसार त्यांनी |

**निशाणी**

| | |
|---|---|
| | जखमेचे प्रमाणपत्र जारी केले त्यावर त्यांची सही व रूग्णालयाचा शिक्का असून ते खरे व बरोबर आहे, त्याबाबत तुम्हाला काय संगावयाचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २७ | अभियोगपक्षाचा सा.नं. ७ तपासी अंमलदार दिलीप रंगनाथ पानसरे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १६.०१.२०१७ रोजी ते पोलीस स्टेशन अकोले येथे हेड कॉस्टेबल म्हणून कार्यरत होते, त्यावेळी ठाणे अंमलदार म्हणून हेड कॉस्टेबल करमाळे हे होते, गुन्हा नं. ०७/२०१७ हा त्यांनी नोंदवला होता, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २८ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर गुन्हयाचा तपासाचा आदेश त्यांना करमाळे यांनी तोंडी दिला होता व ज्यावेळी त्यांच्याकडे तपास आला त्यावेळी त्यांच्याकडे एफ.आय.आर व दैनिक अहवाल हे कागदपत्र आले होते, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २९ | पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांच्याकडे तपास आल्यानंतर ते फिर्याद वाचून घटनास्थळी जावून घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला होता व त्यानंतर तुम्हाला अटक केली होती, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ३० | साक्षीदार तुमच्या विरुध्द का सांगत आहे ? |
| उत्तर | आम्ही त्यांच्या विरूध्द केलेल्या केसला शह देण्याकरीता. |
| प्रश्न ३१ | तुम्हाला इतर काही पुरावा देणे आहे काय ? |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न ३२ | तुम्ही बचावार्थ साक्षीदार तपासणार काय ? |
| उत्तर | नाही. |

आर.सी.सी. ४०/२०१७
सरकार वि. सुभाष थोरात
**निशाणी**

| | |
|---|---|
| प्रश्न ३३ | तुम्हाला केसबाबत काही सांगायचे काय ? |
| उत्तर | खोटी केस केली आहे. |

आरोपीची सही

Thorat

दिनांक – ०४.१०.२०२५
ठिकाण – अकोले.

( अनंत रा. टेंगसे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचे निवेदन माझे समक्ष नोंदविण्यात आले असून वरील सर्व निवेदन हे आरोपीच्या सांगण्याप्रमाणे पुर्णतः व मी ऐकत असतांना खरे व बरोबर असे घेण्यात आले आहे.

( अनंत रा. टेंगसे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले

दिनांक – ०४.१०.२०२५
ठिकाण – अकोले.